# निसिदिन बरसत नैन हमारे

## *भजन-परिचय : विजु कुलकर्णी*

मधुर सरप्राइझ्, २०२०च्यादरम्यान, श्रीगुरुमाईंनी सांगितले होते की, भारतीय संतांनी कशा प्रकारे स्वतःच्या अनुभवांचे वर्णन करत आणि शास्त्रग्रंथांमधील प्रज्ञानाचे सार सांगत भगवंताविषयी तसेच श्रीगुरूंविषयी लिहिले आहे व त्याचे गायन केले आहे. यांपैकी एक संत होते, संत सूरदास. सूरदास जन्मांध होते, तरीपण त्यांना आपल्या अंतश्चक्षूंद्वारे भगवान श्रीकृष्णाची दर्शने होत असत, ज्यांत भगवान कृष्णाचे बालजीवन आणि वृंदावन या गावातील गोपाळ [गायींचे रक्षक] या रूपांमधील दृष्टान्तांचा अंतर्भाव असे.

आपल्या अनेक भजनांतून सूरदासांनी गोपींच्या मुखातून निघालेल्या वाणीद्वारे, भगवंतात विलीन होण्याची त्यांची स्वतःची तीव्र उत्कंठा व्यक्त केली आहे. भगवान कृष्णाप्रति असलेल्या गोपींच्या या भक्तीचे संपूर्ण इतिहासात खूप गुणगान केले गेले आहे. गोपींची त्यांच्या जिवलगापासून ताटातूट झाल्यामुळे त्यांच्यात जी विरहवेदना उत्पन्न झाली आहे तिला सूरदास अत्यंत हृदयस्पर्शी स्वरूपात अविरतपणे वाहणाऱ्या अश्रुधारा असे म्हणत अभिव्यक्त करतात.

गेली पन्नासहून अधिक वर्षे, सिद्धयोग संगीत गायनाची ही अनुपम सेवा मी अर्पण करीत आले आहे आणि त्यातील प्रत्येक क्षण मला अतिशय प्रिय होता तसेच पुढेदेखील कायम राहील. गुरुमाईंनी जेव्हा अनुरोध केला की, मी हे भजन गावे, ज्यामुळे ऑस्ट्रेलियात राहणाऱ्या सर्वांना ज्या वेदना होत आहेत आणि त्यांचे जे नुकसान झाले आहे ते कमी व्हावे तसेच तेथील परिस्थिती संपूर्णतया सामान्य होईपर्यंत त्यांच्या या प्रदीर्घ व खडतर मार्गावर त्यांना आधार मिळावा, तेव्हा मला जाणवले की, *होय, हे तर मी करू शकते; मी निश्चितच असे करेन.*

मी या भजनाचे रेकॉर्डिंग गुरुदेव सिद्धपीठात केले, कारण या ठिकाणी सध्या मी सेवा अर्पण करते आहे. याचे संगीतरचना कर्णमधुर अशा 'मेघ मल्हार' रागात केली गेली आहे. मेघ मल्हार रागाच्या अनेक गुणांपैकी एक आहे, महान प्रसन्नता — ती प्रसन्नता जिच्यासह लोक तसेच निसर्गही रणरणत्या उन्हाळ्यानंतर येणाऱ्या पावसाच्या आगमनाचे स्वागत करतात.

माझी शुभकामना अशी आहे की, या भजनाचे श्रवण आणि सूरदासांच्या शब्दांच्या भावार्थाचे वाचन करून तुम्हाला 'राहत' मिळेल — या कठीण समयी तुम्हाला सुख आणि सांत्वना मिळेल.

# निसिदिन बरसत नैन हमारे

ध्रुवपद :

रात्रंदिवस आमच्या नेत्रांमधून अश्रुधारा बरसत आहेत.
जेव्हापासून भगवान कृष्ण गेले आहेत, तेव्हापासून हा वर्षाऋतु आमच्यासाठी अविरतपणे सुरूच आहे.

पद १ :

आमच्या नेत्रांत लावलेले काजळ आमच्या अश्रूंमध्ये सतत मिसळत असल्यामुळे आमचे गाल आता काळे झाले आहेत.
आमच्या अंगरख्यांवर वाहणाऱ्या अश्रूप्रवाहाच्या संततधारेमुळे ते कधी सुकतच नाहीत.

पद २ :

वर्षाऋतूतील संततधार पावसाप्रमाणे वाहत राहिल्याने आमचे अश्रू
चमचमणाऱ्या ताऱ्यांसारखे चमकत आहेत.
आपल्या जिवलगाच्या शोधार्थ पायपीट करून
आमचे पाय आता थकले आहेत.
सूरदासांना ऐकू येतो आहे गोपींनी केलेला भगवंताचा धावा :
"अवघी ब्रजभूमी आमच्या अश्रूंमध्ये जणू बुडून जाताना दिसते आहे.
हे कान्हा, आम्हाला यातून तारत का नाहीस?"

भाषांतर © २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.